# पुणे महानगरपालिका
## * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक २०

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १३/८/२०१९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. ६९३**

मा.अजय खेडेकर यांचे दि. ६/८/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र. १८ क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, सीई२० सी ३५२/एसबी५-२२०७, प्रभाग क्र.१८ क मध्ये सुधारणा विषयक कामे करणे | १० लाख | --- |
| नवीन सुचविलेली कामे - | | |
| १) प्रभाग क्र. १८ क मध्ये विविध ठिकाणी जेष्ठ नागरिक कट्टे दुरूस्त करणे व विरंगुळा केंद्र दुरूस्ती करणे व तदनुषंगिक कामे करणे. | --- | ५ लाख |
| २)प्रभाग क्र. १८ क मध्ये विविध ठिकाणी विद्युत विषयक कामे करणे.(दिपस्तंभ) | --- | ५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

### माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. ६९४**

उप आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र.१) पुणे महानगरपालिका यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१५ जुलै २०१९ ते दि.३१ जुलै २०१९ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि-१/१९३ दि.२/८/२०१९ चे पत्र.

### सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. ६९५**

शिक्षण विभाग प्राथमिक पुणे महानगरपालिकेकडे कामास असलेले व पगारास मनपा शाळा क्र. ४८ बी इंग्रजी माध्यमाकडे असणारे सेवक श्री.अनिल नागन्ना यमतेकर, हुद्दा-शिपाई यांच्या निलंबनाच्या कालावधीची पहिली सहामाही दि.६/१/२०१९ रोजी व दुसरी सहामाही दि.६/७/२०१९ रोजी पूर्ण होत असून मनपा सेवा विनियम क्र. ५८ नुसार सदर बाब निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/उआ(साप्र)/१९९ दि. ५/८/२०१९ चे पत्र.

### ठरावान्वये आलेले अभिप्राय

**विषय क्र. ६९६**

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील हातगाडी वाल्यावंर कारवाई होते व त्यांना रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार) मा.मुख्य सभा ठराव क्र. ७११ दि.२०/१२/२०१७ अन्वये अतिक्रमण कारवाईत जप्त हातगाडी सोडणेकरिता मान्य झालेले रिमुव्हल चार्जेस रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार) रद्द करुन त्याऐवजी रुपये १,०००/- (रुपये एक हजार) रिमुव्हल चार्जेस आकारुन हातगाडया सोडणेबाबत मा.सौ.सुजाता शेट्टी, मा.सौ.पल्लवी जावळे, मा.सौ.अश्विनी कदम, मा.सौ.वैशाली मराठे, मा.सौ.चाँदबी नदाफ, मा.अविनाश बागवे, मा.श्रीमती लता राजगुरु, मा.सौ.रत्नप्रभा जगताप, मा.सौ.लक्ष्मी दुधाने, मा.सौ.दिपाली धुमाळ, मा.आबा बागुल, मा.सौ.हेमलता मगर, मा.सौ.सुमन पठारे, मा.वनराज आंदेकर, मा.अशोक कांबळे, मा.सौ.नंदा लोणकर, मा.सौ.पुजा कोद्रे, मा.प्रिया गदादे, मा.अजित दरेकर यांचे दि. २०/६/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ३१३ दि. ४/७/२०१९ ला अनुसरुन मा.महा.आयुक्तयांनी जा.क्र. मआ/अतिक्रमण/१९५ दि.३/८/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स**

**विषय क्र. ६९७**

वानवडी रामटेकडी क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या सर्व प्रभागातील पडीक हद्दीतील बीटनुसार झाडण काम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. लोकराज्य स्वयम रोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५,४२,९९,४३६=६६ पेक्षा १८.९९% जास्त निविदाधारकाने दिलेल्या दिलेल्या पत्रानुसार ९.९९% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रू.६,४६,१०,८९९=६८ (र.रू.सहा कोटी सहेचाळीस लाख दहा हजार आठशे नव्यानों रूपये आडुसष्ठ पैसे फक्त) पर्यंत काम करण्यासाठी निविदा सादर केली आहे. तथापि निविदाधारकाने दि.२५/७/२०१९ रोजी दिलेल्या पत्रानुसार स्वखुषीने सदर काम हे पुगप रक्कमे पेक्षा ९.९९% जास्त दराने करणेस तयारी दर्शवलेली आहे. र.रू.५,९७,२३,९५०.३८ तसेच इस्टीमेट मान्य र.रू.५,४२,९९,४३६=६६ पर्यंत काम करून घेणेस आणि निविदा उघडल्याची दि.१/७/२०१९ पासुन काम करून घेणेस व त्यांच्याशी त्याप्रमाणे करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि-४/१९४ दि.३/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. ६९८**

केशवनगर, साडेसतरानळी व पुणे मनपा हद्दीलगत असलेल्या मांजरी येथे टँकरने पाणीपुरवठा करणे (भाग-१) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.रोहित वॉटर टँकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४९,०३,२००/- पेक्षा १% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४८,५४,१६८/- पर्यंत काम करून घेणेसाठी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पापू/१९७ दि.५/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. ६९९**

पुणे मनपाच्या सर्व दवाखाने,रुग्णालये, व प्रसुतिगृहांसाठी बल्क पध्दतीने औषधे खरेदी करणे. ( टेंडर क्रमांक ५ सन २०१९ - २०) कामी निविदा मागविण्यात आलेली असता एकुण १३ निविदा आल्या असून
ज्या ॲटमसाठी ज्या निविदाधारकांनी सर्वात कमी दर दिलेला आहे तो तो ॲटम त्या त्या निविदाधारकाकडून खरेदी करण्यात येणार असून निविदेतील दहा पात्र निविदाधारक १.लक्ष्मी मेडिकल्स २.जिनोवा बायोटेक ३. केप्स फार्मा ४.फार्मासिया लिंक ५.श्री विनायक फार्मा ६.ऑस्टीन हेल्थ केअर ७.नेहा एंटरप्राईजेस ८.ओमनी एंटरप्राईजेस ९.ओसवाल एंटरप्राईजेस १०.फार्माडिल यांचेकडून लघुत्तम दराने बल्क पध्दतीने २४ महिने मुदतीकरीता दरकरार करून सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रक्कम रुपये १०,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये दहा कोटी फक्त ) पर्यंत व सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात RE17F133 या अर्थशिर्षकावर उपलब्ध होणा-या आर्थिक तरतूदीमधून या निविदेतील दहा पात्र निविदाधारकांकडून खात्यास वेळोवेळी आवश्यकता भासेल त्याप्रमाणे औषधे खरेदी करण्यास, त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस आणि खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/२०१ दि.६/८/२०१९ चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०१९-२०
RE 17 F 133
४ औषधे व उपकरणी.
मान्य तरतूद रक्कम रूपये १०,००,००,००० /- पैकी र.रुपये १०,००,००,०००/-

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. ७००**

पुणे शहरातील मोठ्या मृत प्राण्यांसाठी कार्यरत असलेल्या इंन्सिनेरेटर प्लॉट मध्ये चिकन वेस्ट, मटण वेस्ट व पोर्क वेस्ट यांची नाममात्र दराने विल्हेवाट लावणेबाबत मा. डॉ. सिध्दार्थ धेंडे, उपमहापौर, पुणे व मा. सौ. सोनाली लांडगे यांचे दि. १२/१२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १८२४ दि. १७/१२/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र. मआ/आरोग्य/१४५ दि.१२/७/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ६/८/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ७०१**

महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये सादर झालेली खरेदी सुचना व मे.महाराष्ट्र शासनाने कायम करणेत आलेली परचेस नोटीस पुणे मनपाकडे दाखल होत असतात. त्यामुळे कलम १२७ चे बाबत मुख्य

सभा ठराव क्र. ३४ दि.२२/६/२००६ च्या धर्तीवर कलम ४९ अंतर्गत खरेदी सूचना बाबत परचेस नोटीसचे अनुषंगाने भू–संपादन कार्यवाही करणेसाठी खालील प्रमाणे कार्यप्रणाली अवलंबिणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/शअ/१६६६ दि. १८/३/२०१९ चे पत्र.

१)मा.महापालिका आयुक्त यांनी परचेस नोटीस आल्याच्या दिनांकापासून एक महिन्यात विषयपत्र स्थायी समितीकडे सादर करणेस

२)मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्र सादर झाल्यापासून एक महिन्यात मा.स्थायी समितीने मा.मुख्य सभेकडे शिफारस करणेस

३)मा. स्थायी समितीने जर एक महिन्यात निर्णय घेतला नाही तर मा.महापालिका आयुक्त यांनी सदरचा विषय मा.मुख्य सभेकडे पाठविणेस

४) मा.मुख्य सभेने जर याबाबत दोन महिन्याच्या मुदतीत निर्णय घेतला नाही तर मा.महापालिका आयुक्त यांनी परचेस नोटीसबाबत भूसंपादनाची कार्यवाही सुरु करणेस

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ६/८/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ७०२**

भटक्या व मोकाट कुत्र्यांचा व मांजरांचा उपद्रव कमी करण्यासाठी र.रु. १.२० कोटी खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/ १६५ दि.२५/७/२०१९ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९–२०२० चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका, प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयास श्वान गाडया उपलब्ध करणे, RE17F221, | १.२० कोटी | ---- |
| नविन सुचवलेले काम<br>आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका, उपद्रवी प्राण्यांचा बदोबस्त, RE17D114 | ---- | १.२० कोटी |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ६/८/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ७०३**

पुणे मनपा पथ विभागामार्फत राबविणेत येणाऱ्या निरनिराळया पुलांचे व रस्त्यांचे कामाकरीता मे.एनव्हायरोसेफ कन्स्लटंट प्रोजेक्ट यांचे तज्ञ सल्लागारांच्या पॅनेलमध्ये वर्ग (III) (प्रोजेक्ट र.रुपये२०.०० ते ५०.०० कोटीपर्यंत) समाविष्ट करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१७१ दि.२६/७/२०१९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ६/८/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. ७०४**

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील पेठ शुक्रवार फा. प्लॉट क्र. ४०ब/२ येथील गरवारे बालभवन ही मिळकत ओम चॅरीटी ट्रस्ट ही संस्था दि.१५.०८.१९८८ पासून चालवित आहे. वेळोवेळी सदर संस्थेस मुदतवाढ देण्यात आलेली होती. सदर संस्थेबरोबर नव्याने संयुक्त प्रकल्प ३० वर्षे कालावधीसाठी राबविण्याकरिता संपुर्ण प्रिमियम रक्कम रूपये७३,५१,२२५/– दोन टप्प्यात भरून घेऊन व दरवर्षी र.रू १/– प्रमाणे नाममात्र भाडे आकारून ओम चॅरीटी ट्रस्ट या संस्थेबरोबर पुणे महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली २००८ मधील भाग १०(२३) अन्वये मा.महापालिका आयुक्त यांचे विषय पत्रासोबतच्या संयुक्त प्रकल्प प्रस्तावातील अटीशर्तीच्या अधिन राहुन त्यांचेकडून नियमानुसार असणारे शासकीय/निमशासकीय कर भरून घेणेस तसेच त्यांच्याबरोबर ३० वर्षे कालावधीसाठी त्यांच्याबरोबर करारनामा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/७२, दि.११/६/२०१९ चे पत्रावर झालेला मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.१४६ दि.३१/७/२०१९ विचारासाठी.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**